www.sarkarrajpress.com

# सरकार राज

Email: sarkarraj.gurav3@gmail.com

वर्ष : २० ❍ अंक : २७ ❍ ठाणे ❍ दि. १६ ते २२ जून २०२६ ❍ RNI No. MAHMAR/2009/34640 ❍ पाने - ४ ❍

## नगररचना विभागाच्या परीक्षेला मुदतवाढ द्या

★ महाराष्ट्र कर्मचारी संघटनेची महापालिका आयुक्तांकडे मागणी

★ पावसाळी कामकाजामुळे तयारीसाठी वेळ अपुरा

★ ६० दिवसांची मुदतवाढ किंवा मान्सूननंतर परीक्षेची मागणी

**नवी मुंबई** : नवी मुंबई महापालिकेच्या आस्थापनेवरील स्थापत्य अभियंता संवर्गातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या नगररचना विभागातील पदस्थापना व बदली नियुक्तीसाठी आयोजित करण्यात आलेल्या परीक्षेला मुदतवाढ देण्यात यावी, अशी मागणी महाराष्ट्र कर्मचारी संघटनेच्या वतीने महापालिका आयुक्तांकडे करण्यात आली आहे. याबाबत कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष रविंद्र सावंत यांनी निवेदन सादर केले आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, पात्र अधिकारी व कर्मचाऱ्यांना समान संधी उपलब्ध करून देण्यासाठी परीक्षा घेण्याचा प्रशासनाचा उद्देश स्वागतार्ह असला, तरी सध्या सुरू असलेल्या



पावसाळी हंगामामुळे अभियंता संवर्गावर विविध कामांचा मोठा ताण आहे. आपत्ती व्यवस्थापन, जलनिस्सारण व्यवस्था, रस्ते दुरुस्ती, नागरिकांच्या तक्रारींचे निवारण तसेच इतर अत्यावश्यक नागरी सेवांमुळे अधिकारी व कर्मचाऱ्यांना परीक्षेच्या तयारीसाठी पुरेसा वेळ मिळत नाही.

तसेच परीक्षा अधिसूचना प्रसिद्ध झाल्यानंतर अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत आणि प्रत्यक्ष परीक्षा यामधील कालावधी अत्यंत कमी ठेवण्यात आल्याने इच्छुक उमेदवारांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण (उर्वरीत पान २ वर)

## मोदी सरकारला ४३९८ दिवस पूर्ण; भाजपकडून जल्लोष



**नवी मुंबई : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सलग कार्यकाळाला ४३९८ दिवस पूर्ण झाल्याच्या निमित्ताने सीबीडी बेलापूर येथील भाजपच्या स्वामी विवेकानंद नगर मंडळाच्या वतीने विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. तेजस्वी कुंदन म्हात्रे यांच्या माध्यमातून आयोजित या कार्यक्रमात मोदी सरकारच्या विविध योजनांची माहिती देणारे फलक लावण्यात आले.**

## मनसे चित्रपट सेनेचे कलाकारांना व्यासपीठ देण्यासाठी मुक्तांगण




**नवी मुंबई : महाराष्ट्र नवनिर्माण चित्रपट कर्मचारी सेनेतर्फे मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त मनसे चित्रपट सेनेचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष किरण सावंत यांच्यातर्फे कलाकारांना व्यासपीठ उपलब्ध करुन देण्यासाठी मुक्तांगण या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कलाकारांना आपली कला सादर करण्यासाठी एक व्यासपीठ मिळावं, आली कला नागरिकांना दाखवता यावी या दृष्टीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उपस्थित कलाकारांनी गाणी, कविता, एकपात्री नाटक सादर करत आपली कला सादर केली.**

**सिने अभिनेते भूषण कडू, चित्रपट समीक्षक अजय परचुरे, मनसे शहराध्यक्ष गजानन काळे आणि नगरसेवक अभिजीत देसाई यांनी कार्यक्रमाला विशेष उपस्थिती दर्शवली होती. भूषण कडू यांनी सादर केलेल्या धम्माल एकपात्री नाटकाला प्रेक्षकांना प्रचंड हसवले तर मनसे शहराध्यक्ष गजानन काळे यांनी देखिल कविता सादर करत उपस्थितांची मने जिंकली.**

## नवी मुंबईत आरोग्य सुविधांच्या लोकार्पणातून पालकमंत्री एकनाथ शिंदे यांना डावलल्याची चर्चा!

**नवी मुंबई** : नवी मुंबई महापालिकेच्या आरोग्य सुविधांच्या लोकार्पण व शुभारंभ कार्यक्रमात ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री एकनाथ शिंदे यांचे नाव नसल्याने शिवसैनिकांमध्ये नाराजी पसरली आहे. यापूर्वी वाशी सेक्टर-१७ येथील ब्रिज उद्घाटनावेळीही शिंदे यांचे नाव वगळण्यात आले होते.

नवी मुंबईत शिवसेनेचे ४२ नगरसेवक असतानाही गणेश नाईक यांना जाब विचारण्याची हिंमत कोण दाखवणार, असा सवाल शिवसैनिकांमधून उपस्थित केला जात आहे. शिंदे गटातील कार्यकर्त्यांमध्ये याबाबत तीव्र नाराजी असून पक्षाचे पदाधिकारी मात्र मौन बाळगत असल्याची चर्चा रंगली आहे.

साहिल देविदास चौगुले यांनी कार्यक्रमा ठिकाणी आंदोलन केलं असतं मात्र त्यांना खोट्या गुन्ह्यात अडकून त्यांना शांत केला असल्याची चर्चा होत आहे. आरोग्य सुविधांबाबत अनिकेत म्हात्रे यांनी पाठपुरावा केला होता आणि त्यामुळे या ठिकाणी एमआरआय मशीन असो किंवा इतर या सगळ्या सुविधा लागलेल्या असल्याची चर्चा शहरात रंगली आहे.

## पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर नवी मुंबईत १०० विहिरी स्वच्छ करून त्यातील पाण्याचा वापर करण्याचा निर्णय



**नवी मुंबई** : हवामान खात्याने वर्तविलेल्या अंदाजानुसार एल-निनोच्या प्रभावामुळे यावर्षी उशीरा आणि कमी पर्जन्यमान असल्याच्या पार्श्वभूमीवर नवी मुंबई महानगरपालिकेने सावध पावले उचलण्यास यापूर्वीच सुरूवात केलेली आहे. या अनुषंगाने स्वत:च्या मालकीचा प्रतिदिन ४५० द.ल.लि. क्षमतेचा मोरबे धरण प्रकल्प असूनही पुरेसा पाऊस पडत नाही तोपर्यंत उपलब्ध असलेले पाणी पुरविण्याच्या दृष्टीने १० टक्के पाणीकपात केलेली आहे.

सध्या मोरबे धरणातील जलसाठ्यात १२.७३ टक्के इतकीच पाणी उपलब्धता असल्याने आणखी काही जलस्त्रोतांची चाचपणी करताना नवी मुंबई शहरातील १०० पारंपारिक उघड्या विहीरी कार्यान्वित करण्याचा महत्वाचा निर्णय महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी घेतला आहे. त्यादृष्टीने तपासणी करण्याचे निर्देशही पाणीपुरवठा विभागाला देण्यात आलेले आहेत.

आयुक्त महोदयांनी निर्देशित केलेली पाणीपुरवठा विषयक उपाययोजना ही जलस्त्रोत व्यवस्थापनाच्या खबरदारीचा एक भाग आहे. महानगरपालिकेच्या विविध विभागांच्या आढावा बैठकीदरम्यान पाण्याच्या उपलब्धतेच्या अनुषंगाने चर्चा करताना आयुक्तांनी महानगरपालिका क्षेत्रातील पारंपारिक विहिरींचे तातडीने सर्वेक्षण करण्याचे, त्यांची सखोल स्वच्छता करण्याचे तसेच पावसाच्या पाण्याच्या पुनर्भरणासाठी आवश्यक व्यवस्था करण्याचे निर्देश (उर्वरीत पान २ वर)

# विशेष मोहीमेत १५८ किलो प्रतिबंधात्मक प्लास्टिक जप्त व १ लक्ष ५५ हजार दंडात्मक रक्कम वसूली

**नवी मुंबई :** जागतिक पर्यावरण दिनापासून सातत्याने पर्यावरण विषयक जाणीवजागृती करणारे उपक्रम राबविण्यासोबतच वृक्षारोपण, सखोल स्वच्छता मोहीमा, घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६ च्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने माहिती प्रचार अशा विविध मोहीमा राबविल्या जात आहेत. ५ ते १२ जून या कालावधीत असे कार्यक्रम सातत्यपूर्ण राबविण्यात आले.



अशाच प्रकारचा पर्यावरणाला हानिकारक असणा-या प्लास्टिकविषयी जनजागृती करण्याच्या उपक्रमासोबतच एकल वापर प्लास्टिकला प्रतिबंध करण्यासाठी तपासणी मोहीमांचेही सर्वत्र आयोजन करण्यात आले आहे. या अनुषंगाने १२ जूनला आठही विभाग कार्यालय क्षेत्रात विशेष प्लास्टिक प्रतिबंधात्मक मोहीम राबविण्यात आली.

या विशेष मोहीमेमध्ये प्लास्टिक पिशव्या आणि एकल वापर प्लास्टिकचा उपयोग करताना आढळलेल्या ३० व्यावसायिक आणि आस्थापना यांच्यावर कारवाई करीत त्यांच्याकडून १ लक्ष ५५ हजार दंडात्मक रक्कम वसूल करण्यात आली तसेच साधारणत: १५८ किलो प्रतिबंधात्मक प्लास्टिक साठा जप्त करण्यात आला. यामध्ये बेलापूर विभागातून ३० हजार दंडात्मक रक्कम आणि १० किलो प्रतिबंधात्मक प्लास्टिक जप्त करण्यात आले तसेच नेरूळ विभागातून १० हजार दंडात्मक रक्कम व ५ किलो प्रतिबंधात्मक प्लास्टिकची जप्ती करण्यात आली. वाशी विभागातून ५ हजार दंडात्मक रक्कम व ५ किलो प्लास्टिक साठा आणि तुर्भे विभागात ८ व्यावसायिक / आस्थापना यांचेकडून ४५ हजार दंडात्मक रक्कम तसेच तब्बल १०० किलो प्रतिबंधात्मक प्लास्टिक जप्त करण्यात आले.

अशाच प्रकारे कोपरखैरणे विभागातून २० हजार दंडात्मक वसूली आणि २ किलो प्रतिबंधात्मक प्लास्टिक जप्त तसेच घणसोली विभागातून ३० हजार दंडात्मक वसूली आणि २८ किलो प्रतिबंधात्मक प्लास्टिक जप्त करण्यात आले. ऐरोली विभागातूनही १५ हजार दंडात्मक रक्कम वसूली आणि ८ किलो प्लास्टिक जप्त करण्यात आलेले आहे.

# नेरूळ सेक्टर-८ येथील महापालिका ग्रंथालय परिसर अवैध रिक्षा पार्किंगचा अड्डा!

**नवी मुंबई :** ग्रंथपाल आणि समाजकल्याण उपायुक्तांकडे वारंवार तक्रारी करूनही कारवाई शून्य. नवी मुंबई महानगरपालिकेच्या दुर्लक्षामुळे ग्रंथालय परिसराचा अवैध रिक्षा पार्किंगसाठी सर्रास दुरुपयोग होत असून प्रशासनाच्या निष्क्रियतेबाबत नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. महापालिकेचे अधिकारी नेमके कोणाला पाठीशी घालत आहेत, असा सवाल उपस्थित होत आहे.



# नशामुक्ती झटणारे नेरूळचे भूमीपुत्र देवनाथ काशीकृष्णा म्हात्रे सन्मानित

**नवी मुंबई : "UNFILTERED - Real Conversations, Raw Stories" या मंचावर नशामाफियाला धडकी भरवणारे IRS अधिकारी समीर वानखडे सरांच्या हस्ते देवनाथ काशीकृष्णा म्हात्रे यांना सन्मानीत केले.**

**नेरूळ हळूहळू अंमली व गांजाचा अड्डा बनत चालला आहे. यातून तरुणाई बाहेर निघण्यासाठी तसेच नशामुक्त नेरूळ व्हावे यासाठी देवनाथ काशीकृष्णा म्हात्रे यांनी जनजागृती व नेरूळ स्टेशन येथे सह्यांची मोहीम घेतली आणि त्यासाठी त्यांना सन्मानित केले गेले**




## नगररचना विभागाच्या परीक्षेला मुदतवाढ द्या (पान १ वरुन)

झाले आहे. पुरेसा कालावधी उपलब्ध करून दिल्यास अधिकाधिक अधिकारी व कर्मचारी परीक्षेत सहभागी होतील आणि गुणवत्तापूर्ण स्पर्धेला चालना मिळेल, असे संघटनेचे म्हणणे आहे. यापूर्वी नगररचना विभागाच्या अशाच परीक्षांमध्ये अपेक्षित प्रमाणात उमेदवार यशस्वी झाले नसल्याची बाबही निवेदनात अधोरेखित करण्यात आली आहे. अल्प कालावधीत परीक्षा घेतल्यास उमेदवारांच्या अपुऱ्या तयारीमुळे अनुत्तीर्ण होण्याचे प्रमाण वाढण्याची शक्यता असून, त्यामुळे महापालिकेच्या निवड प्रक्रियेबाबत नकारात्मक संदेश जाण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे. दरम्यान, प्रशासन विभागाकडून प्रसिद्ध करण्यात आलेल्या परिपत्रकात परीक्षेचा दिनांक आणि वार नमूद करताना तथ्यात्मक विसंगती आढळून आल्याकडेही संघटनेने लक्ष वेधले आहे. परिपत्रकात 'मंगळवार, दि. १९ जून २०२६' असा उल्लेख करण्यात आला असला, तरी प्रत्यक्षात १९ जून २०२६ हा दिवस शुक्रवार असल्याने संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांमध्ये संभ्रम निर्माण होण्याची शक्यता असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

या सर्व बाबींचा विचार करून सदर परीक्षेला किमान ६० दिवसांची मुदतवाढ देण्यात यावी अथवा मान्सून कालावधी संपल्यानंतर परीक्षा आयोजित करण्यात यावी, अशी मागणी कर्मचारी संघटनेने आयुक्तांकडे केली आहे. यामुळे सर्व पात्र अधिकारी व कर्मचाऱ्यांना समान संधी उपलब्ध होऊन प्रशासनाला अधिक सक्षम व गुणवत्तापूर्ण मनुष्यबळाची निवड करणे शक्य होईल, असा विश्वास संघटनेने व्यक्त केला आहे.

कामगार नेते रविंद्र सावंत यांनी हेच निवेदन ठाण्याचे शिवसेना खासदार नरेश म्हस्के, बेलापुरच्या भाजप आमदार सौ. मंदाताई म्हात्रे, नवी मुंबईच्या महापौर सौ. सुजाता पाटील, स्थायी समिती सभापती अशोक पाटील, विरोधी पक्षनेते विजय चौगुले यांना स्वतंत्रपणे सादर केले आहे.

## पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर नवी मुंबईत... (पान १ वरुन)

पाणीपुरवठा विभागास दिले.

एल निनोच्या परिणामामुळे यावर्षी मान्सून आणखी उशीरा येण्याची शक्यता असल्याने आणि पाणीटंचाईची भीती वाढल्याने हा अत्यंत महत्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. या विहिरीतील पाण्याचा वापर धुणीभांडी, स्वच्छता आणि उद्याने तसेच बांधकामासाठी करता येऊ शकतो हे लक्षात घेत अतिरिक्त शहर अभियंताअरविंद शिंदे यांनी सर्व विभाग कार्यालय क्षेत्रातील पाणीपुरवठा विभागाच्या अभियंत्यांना त्यांच्या क्षेत्रातील विहिरींची संपूर्ण स्वच्छता करून त्यांचे पाणी पिण्याशिवाय इतर दुय्यम उपयोगासाठी वापरण्याचे निर्देश दिले आहेत.

उघड्या विहिरी या बोअरवेलपेक्षा वेगळ्या असतात. त्यामध्ये आधीपासूनच पाणी असते. मात्र, वापरापूर्वी त्यातील गाळ व कचरा काढून त्या स्वच्छ करणे आवश्यक आहे हे लक्षात घेऊन तशा प्रकारचे निर्देश सर्व अभियंत्यांना देण्यात आलेले आहेत. गृहनिर्माण संस्था आणि स्थानिक लोकप्रतिनिधींच्या सहकार्याने शक्य तेथे विहिरींच्या पाण्याचा वापर करण्यासाठी प्रोत्साहित करण्याचे निर्देश आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या वतीने देण्यात आलेले आहेत.

भारतीय हवामानशास्त्र विभागाने (IMD) जाहीर केल्यानुसार प्रतिकूल वातावरणीय परिस्थितीमुळे मान्सूनचा प्रवास मंदावला आहे. दक्षिण कोकण, महाराष्ट्र आणि सोलापूरपर्यंत मान्सून पोहोचला असला तरी त्याची पुढील प्रगती थांबली आहे. कमकुवत वाऱ्यांचा प्रवाह आणि मजबूत मान्सून प्रवाहाचा अभाव यामुळे मान्सूनची उत्तर दिशेकडे वाटचाल मंदावली आहे. तरी पुढील तीन ते चार दिवसांत परिस्थिती सुधारेल, अशी अपेक्षाही व्यक्त करण्यात आलेली आहे. मात्र खबरदारीची उपाययोजना म्हणून नवी मुंबईला पिण्याचे पाणी पुरवणाऱ्या मोरबे धरणातील पाणीसाठा कमी पातळीवर असल्याने १०० पारंपरिक विहिरींचा वापर करण्याचे निर्देश महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी दिलेले आहेत. अशाप्रकारे या विहिरींचे पाणी वापरात आल्याने यापुढील काळात एक मोठा दिलासा मिळणार आहे.

# मोरबे धरणात केवळ १५.२४ टक्के जलसाठा; पाणी जपून वापरण्याचे महापौरांचे आवाहन

## नेरूळमध्ये जलगुणवत्ता तपासणीची पाहणी ; पिण्यायोग्य असल्याचा दावा

**नवी मुंबई :** मोरबे धरणातील वापरण्यायोग्य जलसाठा केवळ १५.२४ टक्क्यांवर येऊन ठेपला असून उपलब्ध साठा जुलै अखेरपर्यंत पुरेल, अशी माहिती महापौर सुजाता पाटील यांनी दिली. दरम्यान, शटडाऊननंतर शहरातील विविध भागांतून पाणी गढूळ येत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर महापालिकेने हाती घेतलेल्या जलगुणवत्ता तपासणी मोहिमेची पाहणी महापौर सुजाता पाटील आणि उपमहापौर दशरथ भगत यांनी नेरूळ येथे केली.

नेरूळ सेक्टर ९ येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मृतीभवन येथे आयोजित करण्यात आलेल्या जलनमुना तपासणी केंद्राला भेट देत महापौर आणि उपमहापौरांनी तपासणी प्रक्रियेची माहिती घेतली. यावेळी स्थानिक लोकप्रतिनिधी, नगरसेवक आणि महापालिकेचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मागील महिन्यात १३ ते १५ मे या कालावधीत पाणीपुरवठा व्यवस्थेच्या दुरुस्ती आणि देखभालीसाठी शटडाऊन घेण्यात आला होता. त्यानंतर पाणीपुरवठा पूर्ववत सुरू झाल्यानंतर शहरातील अनेक भागांत पाण्याचा रंग बदलणे, गढूळ पाणी येणे आणि पाण्याच्या गुणवत्तेबाबत शंका निर्माण होणे अशा तक्रारी मोठ्या प्रमाणावर महापालिकेकडे प्राप्त झाल्या. या तक्रारींची गंभीर दखल घेत महापौर सुजाता पाटील यांनी स्वत: मोरबे धरण, भोकरपाडा जलशुद्धीकरण केंद्र, मुख्य जलकुंभ आणि स्काडा प्रणालीची पाहणी केली होती.

यानंतर पाणीपुरवठा विभागाला शहरातील सर्व विभागांत मोठ्या प्रमाणावर पाण्याचे नमुने गोळा करून त्यांची शास्त्रोक्त तपासणी करण्याचे निर्देश देण्यात आले. महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने विविध भागांत नागरिकांच्या घरांमध्ये जाऊन पाण्याचे नमुने घेतले आणि त्यांची तपासणी केली. तपासणीनंतर पाणी पिण्यायोग्य असल्याचे निदर्शनास आल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. तसेच नागरिकांना प्रत्यक्ष नमुने दाखवून त्यांचे समाधान करण्याचाही प्रयत्न करण्यात आला.

या पार्श्वभूमीवर नेरूळ येथे सुरू असलेल्या जलनमुना तपासणी केंद्राला भेट देताना महापौर आणि उपमहापौरांनी अधिकाऱ्यांकडून सविस्तर माहिती घेतली. पाणीपुरवठा विभागाने तक्रारींवर तत्काळ प्रतिसाद देत केलेल्या कामकाजाबद्दल महापौरांनी अतिरिक्त शहर अभियंता अरविंद शिंदे आणि विभागातील कर्मचाऱ्यांचे कौतुक केले.

महापौर सुजाता पाटील यांनी सांगितले की, शहरातील सर्व विभागांतून घेण्यात आलेल्या जलनमुन्यांची तपासणी करण्यात आली असून सर्व नमुने पिण्यासाठी सुरक्षित असल्याचे निष्पन्न झाले आहे. सुरुवातीला दिसणारा गढूळपणा आता कमी होत असून पाण्याचा रंगही पूर्ववत होत आहे. तरीही नागरिकांच्या मनातील शंका दूर करण्यासाठी जलनमुना तपासणी मोहीम पुढील काही दिवस सुरूच ठेवण्यात येणार आहे.

यावेळी नागरिकांशी संवाद साधताना महापौरांनी मोरबे धरणातील कमी होत चाललेल्या जलसाठ्याबाबत चिंता व्यक्त केली. सध्या धरणाची पाणीपातळी ७१ मीटरपर्यंत खाली आली असून वापरण्यायोग्य जलसाठा १५.२४ टक्के इतकाच उरला आहे. हा साठा जुलै अखेरपर्यंत पुरवठ्यासाठी पुरेसा ठरेल, असा अंदाज व्यक्त करण्यात आला असला तरी पावसाचे आगमन उशिरा झाल्यास परिस्थिती आव्हानात्मक ठरू शकते, असे त्यांनी नमूद केले.

महापौरांनी सांगितले की, यावर्षी वाढत्या तापमानामुळे जलस्त्रोतांमधील बाष्पीभवनाचे प्रमाणही वाढले आहे. त्याचबरोबर हवामान तज्ज्ञांनी अल निनोच्या प्रभावामुळे सरासरीपेक्षा कमी पावसाची शक्यता व्यक्त केली आहे. त्यामुळे नागरिकांनी पाण्याचा काटकसरीने वापर करणे आवश्यक आहे. इतर शहरांमध्ये निर्माण झालेली तीव्र पाणीटंचाई लक्षात घेता नवी मुंबईकरांनी पाण्याचा अपव्यय टाळून जबाबदारीने वापर करावा, असे आवाहन त्यांनी केले.

तसेच कोणत्याही भागात पाणी गढूळ येत असल्यास किंवा पाणीपुरवठ्याबाबत तक्रार असल्यास नागरिकांनी महापालिकेच्या १८००२२३९ या टोल-फ्री क्रमांकावर संपर्क साधावा, असेही त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, पाहणीदरम्यान काही नगरसेवकांनी शहरातील जुन्या जलवाहिन्यांचा प्रश्न उपस्थित केला. अनेक ठिकाणी जुन्या पाइपलाईनला छिद्रे पडल्याने तसेच काही जलवाहिन्या गटारांच्या परिसरातून जात असल्याने दूषित पाणी मिसळण्याचा धोका निर्माण होत असल्याचे त्यांनी सांगितले. भविष्यात अशा समस्या टाळण्यासाठी जुन्या जलवाहिन्यांच्या जागी नवीन पाइपलाईन टाकण्याची मागणीही यावेळी करण्यात आली.

या कार्यक्रमास ब प्रभाग समिती अध्यक्षा रूपाली भगत, क्रीडा समिती सभापती गिरीश म्हात्रे, नगरसेवक प्रदीप गवस, सुरेश शेट्टी, माधुरी सुतार, मीरा पाटील, स्वप्ना गावडे, प्रिती भोपी, डॉ. प्रणाली पाटील तसेच अतिरिक्त शहर अभियंता अरविंद शिंदे आणि पाणीपुरवठा विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

# प्रितम म्हात्रे यांच्या अध्यक्षतेखाली भाजप पनवेल दक्षिण मंडळाची नियोजन बैठक संपन्न

**पनवेल :** भारतीय जनता पार्टी पनवेल दक्षिण मंडळाची महत्त्वपूर्ण नियोजन बैठक रविवार दि. १४ जून २०२६ रोजी श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ सभागृह, मार्केट यार्ड, पनवेल येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. भाजप नेते तथा पनवेल महानगरपालिकेचे मा. विरोधी पक्षनेते प्रितम जनार्दन म्हात्रे यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक संपन्न झाली.

बैठकीमध्ये केंद्रातील मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारच्या यशस्वी १२ वर्षांच्या कार्यकाळानिमित्त आयोजित विविध कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आले. तसेच वृक्षारोपण अभियान, आंतरराष्ट्रीय योग दिन, आणीबाणी स्मृती दिन, बूथ सक्षमीकरण अभियान आणि पक्ष संघटन अधिक मजबूत करण्याच्या दृष्टीने राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.



यावेळी प्रितम जनार्दन म्हात्रे यांनी उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना संघटन हेच पक्षाचे खरे सामर्थ्य असल्याचे सांगितले. प्रत्येक शक्तिकेंद्र, बूथ आणि प्रभाग स्तरावर पक्षाची विचारधारा तसेच केंद्र व राज्य सरकारच्या जनहिताच्या योजना प्रभावीपणे नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी कार्यकर्त्यांनी अधिक सक्रियपणे काम करण्याचे आवाहन त्यांनी केले.

तसेच आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर संघटनात्मक बांधणी, जनसंपर्क वाढ, नवीन कार्यकर्त्यांचा सहभाग, युवा वर्गाशी संवाद आणि सोशल मीडियाच्या प्रभावी वापराबाबतही त्यांनी मार्गदर्शन केले. पक्षाच्या प्रत्येक कार्यक्रमामध्ये जनसहभाग वाढविणे आणि भाजपचे विकासाभिमुख नेतृत्व अधिक बळकट करणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

बैठकीस पनवेल दक्षिण तालुका अध्यक्ष मंगेश वाकडीकर, मा. पंचायत समिती सदस्य जगदीश पवार, पनवेल दक्षिण मंडळ सरचिटणीस किरण माळी, सुनील गवंडी व प्रफुल्ल पाटील, केळवणे जिल्हा परिषद विभाग अध्यक्ष विद्याधर जोशी, गुळसुंदे जिल्हा परिषद विभाग अध्यक्ष अविनाश गाताडे, पळस्पे जिल्हा परिषद विभाग अध्यक्ष विजय गवंडी, आपटा पंचायत समिती अध्यक्ष संदीप पाटील, केळवणे पंचायत समिती अध्यक्ष सुशील ठाकूर, पोयंजे पंचायत समिती अध्यक्ष मंगेश लबडे, गुळसुंदे पंचायत समिती अध्यक्ष प्रतीक भोईर तसेच पळस्पे पंचायत समिती अध्यक्ष गोरक्षनाथ धुमाळ यांच्यासह मंडळ पदाधिकारी, मोर्चांचे अध्यक्ष व सरचिटणीस, विविध सेलचे पदाधिकारी, शक्तिकेंद्र प्रमुख, बूथ अध्यक्ष व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. बैठकीत आगामी सर्व पक्षीय कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जबाबदाऱ्यांचे वाटप करण्यात आले. तसेच मोदी सरकारच्या १२ वर्षांच्या विकासयात्रेची माहिती घराघरात पोहोचविण्याचा आणि संघटन अधिक मजबूत करण्याचा निर्धार उपस्थित पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

# मनपा आयुक्त जाब विचारणार का?

**नवी मुंबई :** महापालिकेच्या मालमत्ता कर विभागात कामकाजावर प्रश्नचिन्ह; नागरिक संतप्त नवी मुंबई महानगरपालिकेच्या मालमत्ता कर विभागातील नाईक यांच्या कामकाजावर नागरिकांकडून नाराजी व्यक्त केली जात आहे. विभागातील अनेक फायली प्रलंबित असून, २५ ते ३० फायली निर्णयाच्या प्रतीक्षेत असल्याची चर्चा मनपा वर्तुळात रंगली आहे.

नागरिकांची कामे वेळेत होत नसल्याने काम करायचे नसेल तर संबंधित अधिकाऱ्यांना येथे का बसवले? असा संतप्त सवाल जागृत नागरिक उपस्थित करत आहेत.....


आकृतीबंधातील नियमांकडे दुर्लक्ष करून दुसरा सहाय्यक आयुक्त नियुक्त का? केल्याची चर्चा सुरू असून, अपेक्षित गतीने काम होत नसल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित होत आहेत. रखडलेल्या फायलींमुळे नागरिक वैतागले असून, मनपा आयुक्त या प्रकरणाची दखल घेऊन जबाबदारी निश्चित करणार का? अशी मागणी आता जोर धरत आहे.....

# युवा नेते मा. आदित्य ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त रुग्णांना फळेवाटप

**नवी मुंबई :** यांच्या वाढदिवसानिमित्त उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने वाशी येथील मनपा रुग्णालय आणि नेरूळ येथील माता-बाल रुग्णालयातील रुग्णांना फळांचे वाटप करण्यात आले.

या उपक्रमात पक्षाचे नवी मुंबई जिल्हाध्यक्ष, पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी पक्षाच्या महिला पदाधिकाऱ्यांनी आदित्य ठाकरे यांना पुढील राजकीय वाटचालीसाठी शुभेच्छा देत, ते लवकरच मुख्यमंत्रीपदी विराजमान व्हावेत अशी प्रार्थना आई एकविरा देवीच्या चरणी केल्याचे सांगितले.










## नवी मुंबई महापालिकेच्या ८० शाळांमध्ये शाळा प्रवेशोत्सव कार्यक्रमातून विद्यार्थ्यांचे होणार उत्साही स्वागत




**नवी मुंबई :** शाळेचा पहिला दिवस हा प्रत्येक विद्यार्थ्याच्या शैक्षणिक प्रवासातील महत्वाचा क्षण असून हे क्षण संस्मरणीय व्हावेत यादृष्टीने नवी मुंबई महानगरपालिका शिक्षण विभागाने शाळा प्रवेशोत्सव कार्यक्रमाची जय्यत तयारी केली आहे. या निमित्ताने महापौरांसह सर्व पदाधिकारी, नगरसेवक तसेच महापालिका आयुक्तांसह सर्व अधिकारी विविध शाळांमधील प्रवेशोत्सोत्सव समारंभप्रसंगी उपस्थित राहून विद्यार्थ्यांचे स्वागत करणार आहेत.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या५७ प्राथमिक आणि २३ माध्यमिक अशा ८० शाळांमध्ये सोमवार, दि. १५ जूनपासून नव्या शैक्षणिक वर्षाची सुरुवात उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात येणार आहे. शाळेचा पहिला दिवस विद्यार्थ्यांसाठी संस्मरणीय ठरावा यासाठी महापालिकेच्या वतीने विशेष 'शाळा प्रवेशोत्सव' निमित्त विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ, फुले आणि टाळ्यांच्या गजरात स्वागत केले जाणार आहे.

प्रवेशोत्सवाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या मनात शाळेविषयी आकर्षण निर्माण करणे, शिक्षणाबाबत सकारात्मक वातावरण तयार करणे तसेच विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासात पालकांचा सहभाग वाढविणे हा मुख्य उद्देश आहे. या निमित्ताने महापालिकेचे पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, अधिकारी, कर्मचारी विविध शाळांना भेट देऊन विद्यार्थ्यांचे स्वागत करणार आहेत. शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके, शैक्षणिक साहित्य तसेच विविध शासकीय योजनांची माहिती देण्यात येणार आहे.

शाळांमध्ये नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी हा क्षण अत्यंत महत्वाचा असल्याचे लक्षात घेत विशेष स्वागत समारंभाचे आयोजन करण्यात आले असून शाळा परिसर आकर्षकरित्या सजविण्यात येत आहे. काही शाळांमध्ये सांस्कृतिक कार्यक्रम व विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये शाळेविषयी व शिक्षणाविषयी गोडी निर्माण होईल, त्यांचा शाळेतील पहिला दिवस आनंददायी होईल आणि शाळाबाह्य मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरेल असा विश्वास शिक्षण विभागाच्या उपायुक्त श्रीम.संघरत्ना खिल्लारे आणि शिक्षणाधिकारी अशोक कडुस यांनी व्यक्त केला आहे.

## मनसे प्रमुख राज ठाकरे यांचा वाढदिवसानिमित्ताने गरजूंना शैक्षणिक साहित्याचे वाटप



**नवी मुंबई :** सन्माननीय राज साहेब ठाकरे यांचा वाढदिवस घणसोली विभागात प्रभाग क्रमांक ७ व ८ च्या वतीने उत्साहात साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती नवी मुंबई मनसे शहर अध्यक्ष गजानन काळे, नवी मुंबई मनसेचे प्रथम नगरसेवक अभिजीत देसाई, नवी मुंबई मनसे सचिव विलास घोणे, मनसे चित्रपट सेना राज्य उपाध्यक्ष श्रीकांत माने, किरण सावंत, नवी मुंबई मनसे विद्यार्थी सेना शहर अध्यक्ष संदेश डोंगरे, नवी मुंबई मनसे स्वयम रोजगार शहराध्यक्ष संप्रीत तुरुमेकर, यांची प्रमुख उपस्थिती होती, याप्रसंगी इयत्ता पहिली ते सातवीच्या विद्यार्थ्यांना शालेय बॅगचे वितरण करण्यात आलं, या कार्यक्रमाचे आयोजन महाराष्ट्र नवनिर्माण सेना घणसोली विभाग अध्यक्ष नितीन नाईक, रोहन पाटील यांनी केलं होते.

कार्यक्रमाला विशेष सहकार्य घणसोली मनसे विभाग सचिव संजय कोळी, बालाजी लोंढे, उपविभाग अध्यक्ष अमित अहिरे, योगेश गायकर, शाखा अध्यक्ष भरत लोंढे, दीपक साबळे, केतन कोळी, हेमंत माने, संदीप डाकवे, विष्णू बांगरड, घणसोली विभागातील सर्व महाराष्ट्र सैनिक यांनी केलं यांचे आभार महाराष्ट्र नवनिर्माण सेना घणसोली विभाग अध्यक्ष नितीन नाईक-रोहन पाटील यांनी मानले आहेत.

हे साप्ताहिक मालक-मुद्रक-प्रकाशक-संपादक **श्री.संजू प्रल्हाद गुरव** यांनी रोशन प्रिन्टर्स, हिरा मनिषा अपार्टमेंट, गाळा नं. ७, शिवाजी रोड, लाईन आळी, पनवेल, जि. रायगड (महाराष्ट्र) -४१०२०६ येथे छापून एसएस-२, रुम नं.२१०, सेक्टर १६, कोपरखैरणे, नवी मुंबई - ४००७०९ येथून प्रकाशित केले. **संपादक- श्री.संजू प्रल्हाद गुरव, मुख्य कार्यालय :** बी-२४, महावीर मार्केट, से.- १८, वाशी, नवी मुंबई. **पनवेल ऑफिस :** मोरबे गाव, द्वारका हौ.सोसा.बी-६ए ०१, **भ्रमणध्वनी: ९२२०७०४०९०. कायदेविषयक सल्लागार :** श्रद्धा खाडे-शहा